महाराष्ट्र राज्य
कला शिक्षण मंडळ, मुंबई
सर ज. जी. कला शाळा आवार, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१. फोन. नं. ०२२ २५१७२१६९/७०
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

Maharashtra State
Board of Art Education, Mumbai
Sir J. J. School of Art compound, Dr. D. N. Road,
Fort, Mumbai- 400 001. Ph. No. 022 25172169 / 70
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

क्रमांक/कशिम-२०२६/पाच/ 1755 दिनांक:- २४.०९.२०२६

## सुधारीत परिपत्रक

विषय: शासकीय रेखाकला परीक्षा-२०२६
प्रश्नपत्रिका सर्व केंद्रप्रमुखांच्या लॉगिनमध्ये उपलब्ध करुन देणेबाबत.
संदर्भ: कशिमं/२०२६/आठ/१७३३, दि.२२/०९/२०२६

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, शासकीय रेखाकला परीक्षा २०२६ (Government Drawing Grade Examination) दिनांक २८ सप्टेंबर ते ०१ ऑक्टोबर २०२६ दरम्यान महाराष्ट्र व महाराष्ट्रा-बाहेरील राज्यांतील विविध परीक्षा केंद्रांवर आयोजित करण्यात आली आहे.

सदर परीक्षेकरीता प्रश्नपत्रिका खालील तक्यात दर्शविलेल्या वेळापत्रकाप्रमाणे सर्व केंद्रप्रमुखांच्या लॉगिनमध्ये उपलब्ध करुन देण्यात येतील.

| एलिमेंटरी ड्रॉईंग ग्रेड परीक्षा | | | |
|---|---|---|---|
| साहित्याची यादी दि.२६/०९/२०२६ वेळ स.९.०० वा | | | |
| प्रश्नपत्रिका खालीलप्रमाणे | | | |
| अनु क्र. | विषयाचे नाव | वेळ | दिनांक |
| १. | वस्तुचित्र (Object Drawing) | स. ६.०० वा | २८ सप्टेंबर २०२६ |
| २. | स्मरणचित्र (Memory Drawing) | स.९.३० वा | २८ सप्टेंबर २०२६ |
| ३. | संकल्पचित्र-नक्षीकाम (Design) | स. ६.०० वा | २९ सप्टेंबर २०२६ |
| ४. | कर्तव्यभूमिती व अक्षरलेखन (Plane Geometry & Lettering) | स.९.३० वा | २९ सप्टेंबर २०२६ |
| इंटरमिजीएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा | | | |
| साहित्याची यादी दि.२८/०९/२०२६ वेळ स.९.०० वा | | | |
| प्रश्नपत्रिका खालीलप्रमाणे | | | |
| १. | स्थिरचित्र (Still Life) | स. ६.०० वा | ३० सप्टेंबर २०२६ |
| २. | स्मरणचित्र (Memory Drawing) | स.९.३० वा | ३० सप्टेंबर २०२६ |
| ३. | संकल्पचित्र-नक्षीकाम (Design) | स. ६.०० वा | ०१ ऑक्टोबर २०२६ |
| ४. | कर्तव्य भूमिती, घनभूमिती व अक्षरलेखन (Geometry, Solid Geometry & Lettering) | स.९.३० वा | ०१ ऑक्टोबर २०२६ |

शासकीय रेखाकला परीक्षेचा दिनांक व वेळापत्रकानुसार केंद्र शाळेच्या लॉगीनवर विषयनिहाय प्रश्नपत्रिका पाठविणार असून केंद्रप्रमुखांनी वेळेत लॉगिन करून प्रश्नपत्रिका डाऊनलोड करावी. तसेच प्रश्नपत्रिकेची प्रत (Hard Copy) सर्व विद्यार्थ्यांना विषयनिहाय देण्यात यावी.

शहरी तसेच ग्रामीण भागातील परीक्षा केंद्रावर वीज पुरवठा अथवा इंटरनेट नेटवर्कमध्ये ऐनवेळी अडथळा निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन, केंद्र प्रमुखांनी प्रश्नपत्रिका डाऊनलोड करणे व झेरॉक्स काढण्यासाठी पर्यायी व्यवस्था पूर्व नियोजित ठेवावी, जेणेकरुन विद्यार्थ्यांना वेळेत प्रश्नपत्रिका उपलब्ध होतील. परीक्षेच्या गोपनीयतेचा भंग होणार नाही, याची जबाबदारी केंद्र प्रमुख यांची राहील, याची नोंद घ्यावी.

सर्व प्रश्नपत्रिका झेरॉक्सवर होणारा खर्च (प्रती विद्यार्थी रु.१०/-प्रमाणे) शासकीय रेखाकला परीक्षा मेहनताना देयक-२०२६ Online पध्दतीने सादर केल्यानंतर देय राहील.

शासकीय रेखाकला परीक्षेकरीता कला संचालनालय व मंडळाकडून नियुक्ती केलेल्या भरारी पथकास संबंधित केंद्रावर केंद्रप्रमुख यांनी उत्तरपत्रिका व प्रश्नपत्रिका इत्यादीबाबतची माहिती देण्यात यावी.

तसेच संबंधित केंद्र प्रमुखांनी स्थानिक पोलीस स्टेशनला शासकीय रेखाकला परीक्षा २०२६ च्या नियोजनाबाबतची माहिती आपल्या स्तरावरुन अवगत करण्यात यावी.

(विनोद दांडगे)
संचालक,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई.

प्रति,
सर्व केंद्रप्रमुख, शासकीय रेखाकला परीक्षा २०२६.

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर

१. पोलीस आयुक्त, सर्व पोलीस आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य.
२. पोलीस अधिक्षक, सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय, महाराष्ट्र राज्य.
३. मा.संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषदा सर्व.
५. शिक्षण निरीक्षक, मुंबई(उत्तर/दक्षिण/पश्चिम).
६. निवड नस्ती